# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dtemaharashtra.gov.in

कालगर्ड_दा
दिनांक : ९.६.२०१७

क्रमांक : १०/एनजीपी/मुदतठेव/प्रवेशक्षमतावाढ/२०१७-१८/ ३४०७
दिनांक : 17 MAY 2017

प्रति,
अध्यक्ष/ सचिव,

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र तंत्रनिकेतनात नवीन पदविका अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेशक्षमतेत वाढ इ. (प्रवेशक्षमता पुनर्स्थापित (Restored Intake by AICTE ) वगळून) यास संचालनालयाची मान्यता देण्याबाबत.....

संदर्भ :- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२०१७/(१०९/१७)/तांशि-५, दिनांक : १६ मे, २०१७.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासनाने आपल्या संस्थेस खालील अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून त्यासमोर नमूद करण्यात आलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास/ प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास परवानगी दिलेली आहे. (प्रवेशक्षमता पुनर्स्थापित (Restored Intake by AICTE ) वगळून)

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | सत्र | प्रवेशक्षमता | मुदतठेव रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |

तरी, त्या अनुषंगाने आपल्या संस्थेस संचालनालयाची मान्यता देण्यासाठी खाली नमूद केलेल्या बाबींची पुर्तता तात्काळ करण्यात यावी. जेणेकरुन अभ्यासक्रम सुरु करण्यास व प्रवेश सुरु करण्यास मान्यता देणे या संचालनालयास सुलभ होईल.

१. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/ अभ्यासक्रमातील प्रवेशक्षमता वाढीसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकांनुसार प्राचार्य व इतर आवश्यक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नियुक्ती करुन त्यांची यादी, नियुक्ती आदेश, रुजू अहवाल व सदर नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकीय

शिक्षण संबंधित सर्वांना मुख्यालय प्रत रवाना

कायमस्वरूपी नियुक्ती स्विकारल्याबाबतचे शिक्षकनिहाय प्रत्येकी रु. १००/- च्या स्टॅप पेपरवर फोटोसह हमीपत्र.

२. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/ प्रवेशक्षमता वाढीसाठी ग्रंथालयाकरीता खरेदी करण्यात आलेल्या पुस्तकांची अभ्यासक्रमनिहाय यादी / संख्या व त्याबाबत पुरवठादाराला रक्कम अदा केल्याबाबतच्या मुद्रांकित पावत्या.

३. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/ प्रवेशक्षमता वाढीसाठी प्रयोगशाळेसाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री तसेच फर्निचर याबाबतची संख्यानिहाय यादी व त्याबाबत पुरवठादाराला रक्कम अदा केल्याबाबतच्या मुद्रांकित पावत्या.

४. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/ प्रवेशक्षमता वाढीसाठी इमारत, ज्यामध्ये लाईट, पाणी, प्रसाधनगृह इ. गोष्टींची सोय असल्याबाबत नोंदणीकृत आर्किटेक्टचे प्रमाणपत्र.

५. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/ प्रवेशक्षमता वाढीसाठी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संस्थाचालक यांच्या संयुक्त खात्यात सोबत जोडलेल्या शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१३/प्र.क्र.४३/तांशि-४, दिनांक २१.०८.२०१३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रथम वर्षासाठी, राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल्ड बँकेत १० वर्ष मुदतीसाठी मुदतठेव जमा करण्यात यावी.

६. ज्या संस्थांनी संचालनालयास/ शासनास विहित नोंदणी शुल्क न भरता/ थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस प्रस्ताव सादर केलेले असतील अशा संस्थांनी सोबत जोडलेल्या शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१३/प्र.क्र.४३/तांशि-४, दिनांक २१.०८.२०१३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार विहित नोंदणी शुल्क संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास जमा करुन त्याची छायांकित पावतीची प्रत सोबत जोडावी.

७. सोबत जोडलेल्या नमुन्यात रु. १००/- च्या स्टॅप पेपरवर नोंदणीकृत करारनामा (Agreement) या संचालनालयास सादर करावे.

८. वर नमूद कागदपत्रांसह प्रवेशप्रक्रियेच्या परवानगीसंबधी सोबत जोडलेल्या यादीनुसार कागदपत्रांसह परिपुर्ण प्रस्ताव या संचालनालयास दिनांक : ९.६.२०१७ पर्यंत सादर करावा.

वरील बाबींची पुर्तता केल्यानंतरच संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये नमूद अटींच्या अधीन राहून सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/ प्रवेशक्षमता वाढीस शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रीयेस या संचालनालयाकडून मान्यता देण्यात येईल. तरी संबंधित संस्थांनी विहीत मुदतीत वर नमूद आवश्यक कागदपत्रे सादर करुन संचालनालयाची मान्यता घेण्यात यावी, अन्यथा संबंधीत अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०१७--१८ मधील प्रवेशाबाबत संबंधित संस्थांना काही समस्या उद्भवल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबधित संस्थांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(चंद्रशेखर ओक) भा.प्र.से.
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे त्यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या विभागातील उपरोक्त प्रस्ताव सादर केलेल्या सर्व व्यावसायिक पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधीत संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/नवीन संस्था/२०१७/ 1184
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 18/5/2017.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

१) अध्यक्ष/सचिव/प्राचार्य, सोबतच्या यादीतील संस्था यांना कळविण्यात येते की, सोबतच्या संचालनालयाचे पत्राच्या अनुषंगाने दिलेल्या मुदतीत आवश्यक कार्यवाही करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना सोबतच्या यादीतील संस्थांना ई-मेल करण्याकरीता

औषधनिर्माणशास्त्र/ अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या सुरु असलेल्या संस्थेत नवीन पदविका अभ्यासक्रम / प्रवेशक्षमता वाढ करीता संचालनालयाचे परवानगीसाठी खालील प्रमाणे कागदपत्र प्रस्तावासोबत अनुक्रमे जोडून सादर करावीत.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून (AICTE) संस्थेस प्राप्त झालेल्या मान्यतेची छायांकित प्रत.
२. शासनामार्फत मिळालेल्या शासन मान्यता (GR) पत्राची झेरॉक्स प्रत.
३. सोबत जोडलेल्या नमुन्यात रु. १००/- च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत करारनामा (Agreement) ची मुळप्रत.
४. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/ प्रवेशक्षमता वाढीसाठी शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१३/प्र.क्र.४३/तांशि-४, दिनांक : २१.८.२०१३ मध्ये विहीत करण्यात आलेल्या प्रमाणे १० वर्ष मुदतीसाठी करण्यात आलेल्या संयुक्त मुदतठेव मुळपावती व त्याची साक्षांकित छायाप्रत.
५. ज्या संस्थांनी संचालनालयास/ शासनास विहित नोंदणी शुल्क न भरता/ थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस प्रस्ताव सादर केलेले असतील अशा संस्थांनी सोबत जोडलेल्या शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१३/प्र.क्र.४३/तांशि-४, दिनांक २१.०८.२०१३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार विहित नोंदणी शुल्क संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास जमा करुन त्याची पावती सोबत जोडावी.
६. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/ प्रवेशक्षमता वाढीसाठी संस्थेत नियुक्ती करण्यात आल्याबाबतचे शिक्षकीय कर्मचाऱ्यांचे रु. १००/- च्या स्टँप पेपरवर (शिक्षक निहाय वेगवेगळे) त्यांच्या पासपोर्ट फोटोसहित करण्यात आलेले मुळ शपथपत्र.
७. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/ प्रवेशक्षमता वाढीसाठी संस्थेत नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे नेमणूक आदेश व त्यांच्या स्वाक्षरीचा रुजू अहवाल यांच्या साक्षांकित छायाप्रती.
८. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/ प्रवेशक्षमता वाढीसाठी संस्थेत खरेदी करण्यात आलेली पुस्तके/ साहित्याची यादी, खरेदी केल्याचे बिल, तसेच संबंधीतास पैसे अदा केल्याबाबतच्या पावत्यांच्या साक्षांकित छायाप्रती.
९. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/ प्रवेशक्षमता वाढीसाठी इमारतीचे बांधकाम क्षेत्राबाबत नोंदणीकृत आर्किटेक्टचे प्रमाणपत्र, इमारतीत वीज, पाणी, टॉयलेट, बाथरुम, लेडीजरुम, इ. सुविधा असल्याबाबत प्रमाणपत्र.
१०. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी/ प्रवेशक्षमता वाढीसाठी असलेल्या इमारतीत आग प्रतिबंधक यंत्रणा बसविण्यात आल्याबाबतची कागदपत्रे.
११. मान्यतेसाठीचा प्रस्ताव बॉक्स फाईलमध्ये सादर करावा व सर्व कागदपत्रे प्राचार्यांनी साक्षांकित करुन तसेच उपरोक्त अनुक्रमांकानुसार पताका (फ्लॅगींग) करुन सादर करावीत.

विना अनुदान तत्त्वावर नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था सुरु करणे, सुरु असलेल्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे किंवा मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करण्यासाठीच्या प्रस्तावाकरिता नोंदणी शुल्क आकारणे व संयुक्त खात्यात मुदत ठेव ठेवण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१३/प्र.क्र.४३/तांशि-४**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०० ०३२

तारीख: २१ ऑगस्ट, २०१३

<u>वाचा —</u>

१) शासन निर्णय क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. सीटीसी-२०११/(प्र.क्र. ४२/११)/तांशि-४, दिनांक २४ .०१. २०१२.

२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/(नों.शुल्क/मु.ठेव)/२०१२/१९७३, दिनांक २०.११.२०१२.

३) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/(नों.शुल्क/मु.ठेव)/२०१२/२०७४, दिनांक १४.१२.२०१२.

४) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/(नों.शुल्क/मु.ठेव)/२०१३/७०, दिनांक १५.१.२०१३.

५) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/(नों.शुल्क/मु.ठेव)/२०१३/१४६, दिनांक ३०.१.२०१३.

<u>प्रस्तावना —</u>

राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विनाअनुदानित तत्त्वावर नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था सुरु करणे, सुरु असलेल्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे किंवा मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करण्यासाठीच्या अभ्यासक्रमांबाबत संयुक्त खात्यात मुदत ठेव ठेवण्यासाठी आकारावयाचे सुधारीत नोंदणी शुल्क व मुदत ठेवींची रक्कम शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. सीटीसी-२०११/(प्र.क्र.४२/११)/तांशि-४, दि. २४.१.२०१२ अन्वये

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून निश्चित करण्यात आली आहे. सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून करण्यात येत आहे. परंतु सदर अंमलबजावणी करताना संचालनालय स्तरावर शासन निर्णयातील पृष्ठ क्र. ३ वर नमूद सुधारीत मुदत ठेव या शिर्षाखालील तक्त्याच्या संदर्भात काही अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसेच पी.आय.ओ व एनआरआय च्या जागा या संदर्भातील मुदतवाढीबाबत, प्रवेश क्षमता कमी करणे/अभ्यासक्रम बंद करणे, संस्थेचे स्थलांतर अथवा नांवात बदल, परदेशी संलग्नता, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका, पदविकोत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या मंजूर क्षमतेत वाढ यासाठी आकारावयाचे नोंदणी शुल्क निर्धारीत करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅण्डबुकनुसार डयुअल पदवी/इंटीग्रेटेड कोर्सेस नव्याने दोन विषयांचा समावेश करण्यात आला असून त्यासाठी सुध्दा शुल्क निर्धारीत करणे आवश्यक आहे. तसेच परदेशी विद्यापीठ/संस्थेच्या संलग्नतेबाबत सुध्दा मुदतठेवीचे शुल्क निर्धारीत करणे आवश्यक आहे. हे विचारात घेऊन उपरोक्त शासन निर्णय दि. २४.१.२०१२ मध्ये नमुद केलेल्या अभ्यासक्रमाच्या शुल्काव्यातिरिक्त सुधारीत नोंदणी शुल्क व सुधारीत मुदत ठेव निश्चित करण्यासंदर्भात नव्याने शासन आदेश निर्गमित करण्याची निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय—

पी.आय.ओ व एनआरआय च्या जागा या संदर्भातील मुदतवाढीबाबत, प्रवेश क्षमता कमी करणे/अभ्यासक्रम बंद करणे, संस्थेचे स्थलांतर अथवा नांवात बदल, परदेशी संलग्नता, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका, पदविकोत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या मंजूर क्षमतेत वाढ, दुसरी पाळी व अंशकालीन अभ्यासक्रम सुरु करणे यासाठी आकारावयाचे नोंदणी शुल्क निर्धारीत करणे. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅण्डबुकनुसार डयुअल पदवी/इंटीग्रेटेड कोर्सेस नव्याने दोन विषयांचा समावेश करण्यात आला असून त्यासाठी सुध्दा शुल्क निर्धारीत करणे. तसेच परदेशी विद्यापीठ/संस्थेच्या संलग्नतेबाबत सुध्दा मुदतठेवीचे शुल्क निर्धारीत करणे, हे विचारात घेऊन सुधारीत नोंदणी शुल्क व सुधारीत मुदत ठेव खालीलप्रमाणे निर्धारीत करण्यात येत आहे :-

विनाअनुदानित पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर/पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था/महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी सुधारीत नोंदणी शुल्क

| अ. क्र. | प्रस्तावाचे स्वरुप | ज्या ठिकाणी प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु आहेत किंवा सुरु करण्यात येणार आहेत त्या ठिकाणासाठी विहित केलेली नोंदणी शुल्कांची रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुंबई, ठाणे, नवी मुंबई | पुणे, नागपूर, औरंगाबाद, पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका क्षेत्र | उर्वरीत महानगरपालिका | उर्वरीत महानगरपालिका |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नवीनअभियांत्रिकी/तंत्रशास्त्र/वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये | रु. २,२५,०००/- | रु. १,५०,०००/- | रु.१,१२,५००/- | रु. ७५,०००/- |
| २ | नवीन अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र/वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था | रु. १,५०,०००/- | रु. १,१२,५००/- | रु. ७५,०००/- | रु. ४५,०००/- |
| ३ | नवीन अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र/वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी/एमबीए/एमएमएस/ एमसीए/पीजीडीएम/पीजीडीबीएन अभ्यासक्रमाची | रु. १,५०,०००/- | रु. १,१२,५००/- | रु. ७५,०००/- | रु. ४५,०००/- |

| अ. क्र. | प्रस्तावाचे स्वरुप | ज्या ठिकाणी प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु आहेत किंवा सुरु करण्यात येणार आहेत त्या ठिकाणासाठी विहित केलेली नोंदणी शुल्काची रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर/पदविकोत्तर पदविका महाविद्यालये | | | | |
| ४ | सुरु असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालये तथा संस्थेत प्रथम वा दुसऱ्या पाळीमध्ये अतिरीक्त/नवीन भ्यासक्रम सुरु करणे व अभ्याक्रमाच्या मंजूर प्रवेश क्षमतेत वाढ करणे | रु. ७५,०००/- | रु. ६०,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ३७,५००/- |
| ५ | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारीत नसलेल्या इतर अभ्यासक्रमांचे प्रस्ताव व इतर अंशकालीक पदविका वा पदविकोत्तर अभ्यासक्रम | रु. ६०,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ३०,०००/- | रु. १५,०००/- |
| ६ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालयांचे तथा संस्थांचे स्थलांतरण | रु. १,३५,०००/- | रु. ९०,०००/- | रु. ६७,५००/- | रु. ४५,०००/- |
| ७ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये तथा संस्था बंद करणे | रु. १,३५,०००/- | रु. ९०,०००/- | रु. ६७,५००/- | रु. ४५,०००/- |
| ८ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारीतील | रु. १,३५,०००/- | रु. ९०,०००/- | रु. ६७,५००/- | रु. ४५,०००/- |

| अ. क्र. | प्रस्तावाचे स्वरुप | ज्या ठिकाणी प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु आहेत किंवा सुरु करण्यात येणार आहेत त्या ठिकाणासाठी विहित केलेली नोंदणी शुल्काची रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अभ्यासक्रमांची दुसरी पाळी व अंशकालीन अभ्यासक्रम सुरु करणे | | | | |
| ९ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत पी.आय. ओ. च्या जागा व त्यांच्या मुदतवाढीबाबत | रु. १,३५,०००/- | रु. ९०,०००/- | रु. ६७,५००/- | रु. ४५,०००/- |
| १० | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयात तथा संस्थेत एन.आर. आय. च्या जागा व त्यांच्या मुदतवाढीबाबत | रु. १,३५,०००/- | रु. ९०,०००/- | रु. ६७,५००/- | रु. ४५,०००/- |
| ११ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेतील मंजूर प्रवेश क्षमता कमी करणे/अभ्यासक्रम बंद करणे | रु. ७५,०००/- | रु. ६०,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ३७,५००/- |
| १२ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नावात बदल करणे | रु. ७५,०००/- | रु. ६०,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ३७,५००/- |
| १३ | ड्यूअल पदवी/इंटिग्रेटेड कोर्सेस | रु. ७५,०००/- | रु. ६०,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ३७,५००/- |
| १४ | परदेशी संस्था/विद्यापीठ यांचा सहयोग | रु. ४,५०,०००/- | रु. ३,००,०००/- | रु. २,२५,०००/- | रु. १,५०,०००/- |

विनाअनुदानित पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका, पदव्युत्तर/पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था/महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी सुधारीत मुदत ठेव

| अ. क्र. | प्रस्तावाचे स्वरुप | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष |
|---|---|---|---|
| १ | पदवी अभ्यासक्रमाची नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये | रु. २२,५०,०००/- | रु. २२,५०,०००/- |
| २ | औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाची नवीन महाविद्यालये | रु. १२,००,०००/- | रु. १०,५०,०००/- |
| ३ | एमबीए/एमएमएस/एमसीए/पीजीडीएम/पीजीडीबीएम अभ्यासक्रमाची नवीन पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका महाविद्यालये | रु. १०,५०,०००/- | रु. ९,००,०००/- |
| ४ | पदविका अभ्यासक्रमाची नवीन तंत्रनिकेतने (अभियांत्रिकी) | रु. ९,००,०००/- | रु. ७,५०,०००/- |
| ५ | वास्तुविद्या/औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था | रु. ७,५०,०००/- | रु. ७,५०,०००/- |
| ६ | संगणक प्रगत अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था | रु. ३,००,०००/- | रु. ३,००,०००/- |
| ७ | पदवी/पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका अतिरीक्त अभ्यासक्रम | रु. ४,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम | - |
| ८ | पदविका अतिरीक्त अभ्यासक्रम | रु. ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| ९ | वाढीव प्रवेश क्षमता/पदवी/पदविका/पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका (अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकान्वये निर्धारीत एका तुकडीसाठी) | रु. १,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| १० | पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम (अंशकालीन) | रु. ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |